**प्रकाशकार्याचे वृत्तपत्र**



महर्षी अमर (१९१९–१९८२)

**ऋषींनी शिकवले तसे आम्ही ध्यान शिकवतो.**

### प्रकाश

सृष्टीमागील बुद्धिमान शक्ती आहे. प्रकाश म्हणजे स्वतः परमेश्वरच.

### प्रकाशकार्य

सर्वोत्तम जीवन जगण्यासाठी, सर्व जीवांना त्यांच्या जाणीवेची आणि अनुभवाची पातळी उंचावण्यात मदत करणे आहे.

### प्रकाशजीव

या आणि उच्च जगात राहणारे ऋषी आहेत. ते ज्ञानाचा प्रकाश आणि शक्ती गोळा करतात आणि पसरवतात.

### सप्तऋषी

सर्वोच्च आध्यात्मिक अधिकारी आहेत. ते निवडलेले महात्मे आहेत. ते, सर्व जीवांना इथे शांती आणि परिपूर्णतेचे जीवन जगण्यासाठी आणि त्यांचे मूळ म्हणजे प्रकाशाकडे परत जाण्यासाठी त्यांचे मार्गदर्शन करतात.

### महर्षी अमर

प्रत्यक्ष सप्तर्षींच्या संपर्कात असणारे एक विशेष महात्मे होते. त्यांनी उच्च जीवनाच्या सत्ययुगासाठी ज्ञान आणि मार्गदर्शक सूचना उच्च जगातून पृथ्वीवर आणल्या.

### गुरुजी कृष्णानंद

महर्षी अमरांचे पट्टशिष्य होते. त्यांनी ऋषींचा मार्ग, सप्तर्षी ध्यानयोग विकसित केला आणि तपोनगरात सप्त ऋषींच्या आध्यात्मिक केंद्राची स्थापना केली.

### सप्तर्षी ध्यानयोग

हा लौकिक आणि आध्यात्मिक जीवन योग्य रीतीने जगण्यासाठी ऋषींनी शिकवलेला ध्यानाचा आणि भावनांना व विचारांना सकारात्मक बनविण्याचा एक अद्वितीय मार्ग आहे.

### दृढ वचन

★ आपण एकाच दिव्य प्रकाशाचे (परमेश्वराचे) कण आहोत.
★ प्रेम हा आपला स्वभाव आहे.
★ शांतता ही आपली भाषा आहे
★ ध्यान हा आपला मार्ग आहे
★ हे जग आपले आश्रयस्थान आहे
★ सर्व सृष्टीच आपलं कुटुंब आहे
★ परमेश्वर आपला गुरु आहे; ऋषी आपले मार्गदर्शक आहेत.

# प्रकाशमार्ग

Volume 5 Issue 4 JANUARY 2013 Rs. 25

## चिंतन

गुरुजी कृष्णानंद, अनुवाद : जयंत देशपांडे
(मागील अंकांमधून घेतलेले वेचे)

जे ज्ञान मी लोकांपर्यंत पोचवण्याचा प्रयत्न करतो आहे, ते पुस्तकांमधून मला मिळालेले नाही. माझ्या गुरुंनी ते मला दिलेले आहे. ज्या ऋषींनी वेदांचे ज्ञान आपल्याला दिले, त्या ऋषींकडून त्यांनी हे ज्ञान मिळवले होते. मला ठाऊक आहे की, हे शुद्ध दोषरहित ज्ञान आहे.

सत्याला प्रमाणपत्राची आवश्यकता नसते. त्याला आधाराची गरज नसते. त्याला स्वतःच्या आधारावर उभे राहावे लागते आणि स्वयंप्रकाशाने चमकावे लागते. मी ज्या ज्ञानाचा प्रसार करतो आहे, ते जर खरे असेल तर ते स्वबळावर उभे राहील व चमकेल.

माझ्या कार्याबद्दल व योजनांबद्दल सांगायचे झाले तर मला नाही वाटत की, लोकांना माझी भूमिका स्पष्टपणे समजली आहे. काही विशिष्ट कारणांमुळे माझे हे काम कठीण आहे. ही कारणे मी आत्ताच उघड करू शकत नाही. मानवी सामान्य ज्ञानाच्या बळावर कदाचित यापेक्षा अधिक स्पष्ट चित्र उभे राहू शकले असते आणि त्यामुळे या मुद्द्यावर मी त्यांना अतिभाबडा आणि अव्यवहारी वाटत असेन. आध्यात्मिक बंधने कधी कधी तर्क आणि लॉजिकला धरून राहू शकत नाहीत.

माझ्या अवती भोवती असणाऱ्या साधकांनी माझ्याप्रती दाखवलेल्या प्रेमामुळे व भक्तीमुळे मी खूप भारावलो आहे. आणि त्यांच्यामध्ये इतके प्रेम आहे, इतका जिवंतपणा आहे की त्यामुळे मला माझ्या कामात खूप समाधान व आनंद मिळतो.

सुकलेल्या ओठांवर आलेले स्मित, सुकलेल्या चेहेऱ्याचे उजळणे आणि निराश मनात आशेचे अंकुरणे, या गोष्टी पोकळ आश्वासनांमुळे किंवा दूरवर दिसणाऱ्या मृगजळामुळे आलेल्या नसून, जीवनाला सामोरे जाण्यासाठी नव्याने मिळालेल्या धीरामुळे आणि ईश्वराप्रती बळकट झालेल्या श्रद्धेमुळे होत आहेत आणि अशा गोष्टी मला माझी पुढील लाखो आयुष्ये या कार्याला वाहून घेण्यासाठी प्रेरणा देतात.

एका विद्यार्थ्याने त्याची वही मला तपासण्यासाठी दिली. मी ती तपासून परत केली. काही दिवसांनंतर त्याने मला सांगितले, "माझ्या मनात हा विचार आला की आपण कोणावरही संपूर्णपणे विश्वास टाकायला नको." मला समजले नाही आणि त्याने मला ते नीट समजावून सांगावे यासाठी मी वाट पाहिली. त्याने सांगितले की, मी एक चूक दुरुस्त केली नव्हती ! त्याला माझ्या योग्यतेवर संपूर्ण विश्वास होता. मी हळूच त्याला सांगितले – 'नजरचुकीने असे झाले.'

मी ते विसरू शकलो नाही आणि पुष्कळदा त्याबद्दल विचार केला. विद्यार्थी त्याच्या गुरुकडून फक्त परिपूर्णतेचीच अपेक्षा करतो. ते साहजिकच आहे. गुरुकडून कधीही चूक होता कामा नये. गुरुच्या भूमिकेत चुकीसाठी जागा नाही. अगदी एखाद्या किरकोळ त्रुटिमुळे सुद्धा परिपूर्णता ही परिपूर्णता राहू शकत नाही.

इथे माझ्या वैयक्तिक जीवनाबद्दल लिहिणे योग्य होणार नाही, असे माझ्या दोन जुन्या मित्रांनी सांगितले. त्यांनी मला विचार करण्यास बाध्य केले. आत्मचरित्रात्मक लिखाण व्यक्तिनिरपेक्ष असू शकत नाही. मी रूढार्थाने संन्यासी नाही. मी भगवे वस्त्र घालत नाही. मी रंग नसलेला साधक आहे. आता मला वैयक्तिक आणि आध्यात्मिक यामध्ये कोणतेही अंतर दिसत नाही. माझ्याजवळ लपवण्यासारखे काही नाही आणि दाखवण्याजोगेही काही नाही. मला कोणत्याच तक्रारी नाहीत, दुःख नाही. मी जसा आहे तसा खूष आहे. ■

**मानसा फाउंडेशन (रजि.)**
तपोनगर, चिक्कगुब्बि, (ऑफ हेन्नूर–बागलूर रोड) बंगलोर अर्बन ५६० ०७७. इंडिया.
फोन : (०८०) २८४६५२८०, ९९०००७५२८० (सकाळी १० ते दु. ४ पर्यंत)
इ–मेल : info@lightagemasters.com वेबसाईट : www.lightagemasters.com

## ध्यान वर्ग

**तपोनगरात फक्त दर रविवारी भरतो**

प्राथमिक पातळी – सकाळी १० वाजता

**बंगलोर शहरातील केंद्रांमधे वर्ग खालीलप्रमाणे भरतात**

**दर रविवारी** (सकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर सोमवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर मंगळवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
श्री ऑरोबिंदो कॉम्प्लेक्स, फेज १,
जे.पी. नगर

**दर बुधवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
आर्य समाज, सी.एम.एच. रोड, इंदिरानगर
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम
मारुति मंदिर, विजयनगर

**दर गुरुवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
देवगिरी वेंकटेश्वर मंदिर, बनशंकरी स्टेज २

**दर शुक्रवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
इंडियन हॅरिटेज अकॅडमी, ब्लॉक६,
कोरामंगला

**दर शनिवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम

**आनेकल येथे**

**दर सोमवारी** (संध्याकाळी ६ वाजता)
**दर मंगळवारी** (सकाळी ६ वाजता)

बाहेरील विद्यार्थ्यांसाठी पोस्टाद्वारे किंवा ई-मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. अधिक माहिती साठी पान ६ वरील पहिला कॉलम वाचावा.

**Doorways (इंग्रजीत) / तपोवाणी (कन्नड) / प्रकाशमार्ग (मराठी) वार्षिक वर्गणी रू. ३००/- ड्राफ्ट कृपया मानसा लाइट एज फाउंडेशन च्या नावाने काढावा. कृपया 'मनी ऑर्डर' ने पैसे पाठवू नये.**

## वृत्तपत्र

आपल्या मित्राला भेट करावे. वर्गणी सोबत, त्यांचं नाव व पत्ता आमच्याकडे पाठवावा.



**१४ डिसेंबर या दिवशी, अंतरमानसा येथील या प्रार्थनामंदिरात गुरुजींची पवित्र रक्षा ठेवण्यात आली**

## काही ठळक घडामोडी

- २३-११-२०१२ रोजी सकाळी गुरुजींनी महासमाधी घेतली. त्यांचे शेवटचे दर्शन घेऊन अंतिम अभिवादन करण्यासाठी हजारो लोकांनी तपोनगरास भेट दिली.
- २४-११-२०१२ रोजी मध्यान्ही १२ वाजता तपोवनात त्यांच्या अंत्यक्रियेसाठी जमलेल्या सुमारे एक हजार लोकांनी दहन संस्काराच्या आधी प्रार्थना करून त्यांना प्रकाश प्रवाहित केला.
- तपोवनात ज्या ठिकाणी अंत्यक्रिया करण्यात आली तेथे आता एक पिरॅमिडच्या आकाराची वास्तू बांधली आहे.
- तपोवनातील या पिरॅमिडमध्ये आणि अंतर मानसा येथे गुरुजींची पवित्र रक्षा ठेवली आहे.
- २८-११-२०१२ रोजी तपोनगरातील मेडिटेशन हॉल मध्ये १५० पेक्षा अधिक ध्यानसाधकांनी जमून चंद्रग्रहण समयी ध्यान केले.

## "लाईट चॅनल्स वर्ल्ड मूव्हमेंट" बद्दल वृत्तांत

- नोव्हेंबर २०१२ मधे आपल्या स्वयंसेवकांनी ४०० पेक्षा अधिक सत्रांचे आयोजन केले. या सत्रांमधे १,३०,००० पेक्षा जास्त मुलांनी प्रकाशाचे प्रवहन केले.
- आतापर्यंत २३ लाखांपेक्षा जास्त मुलांनी निदान एकदा तरी प्रकाशाचे प्रवहन केले आहे आणि एक हजारापेक्षा जास्त शाळांतील जवळजवळ ५ लाख मुले दररोज त्यांच्या शाळेतील दैनिक प्रार्थनेच्या वेळी प्रकाशाचे प्रवहन करतात.

## ध्यानासाठी विशेष दिवस

| | | |
|---|---|---|
| ०५ | शनिवार | कृष्णाष्टमी |
| १० | गुरुवार | शिवरात्री |
| ११ | शुक्रवार | अमावास्या |
| १४ | सोमवार | उत्तरायणारंभ / मकर संक्रांती |
| १९ | शनिवार | शुक्लाष्टमी |
| २१ | सोमवार | शुक्ल दशमी |
| २७ | रविवार | पौर्णिमा |

## तपोनगरातील कार्यक्रम

| | |
|---|---|
| दर रविवारी | – व्याख्यान सकाळी ११ ते १२ पर्यंत |
| | – विशेष ध्यान आणि प्रकाश प्रवहन, मध्यान्ह १२ ते दुपारी १ पर्यंत |
| रविवार १३ | – शंबला गटाची बैठक दुपारी २ वाजता |
| रविवार २० | – 'रा' गटाची बैठक दुपारी २ वाजता |

संपूर्ण जगभरातून अनेक ध्यानसाधकांनी गुरुजींबद्दल मन:पूर्वक सांत्वन व्यक्त केले आहे. त्याबद्दल आम्ही प्रत्येकाचे आभारी आहोत.

**रविवारच्या व्याख्यानाचे, इंटरनेटवरून प्रत्यक्ष प्रसारण विद्यार्थ्यांकरता उपलब्ध राहील. सविस्तर माहितीसाठी कृपया मानसा कार्यालयाशी ई-मेल द्वारा संपर्क साधावा.**

## तपोनगर डायरी

सीमा अलमेल सोमायाजी, अनुवाद : वैशाली जोशी

मानसा फाउंडेशनचे ध्यानसाधक त्यांच्या जीवनात घडू शकणाऱ्या सर्वात दु:खद घटनेला तोंड देण्यात सफल झाले. ही घटना होती गुरुजींचे पारलौकिक जगात स्थित्यंतर. २३ नोव्हेंबरला गुरुजींनी शेवटचा श्वास घेतला. त्यांच्या आत्म्याचे मंदिर, त्यांचे भौतिक शरीर घरी आणले जाणार होते. यासाठी तपोनगरवासियांना मनाची तयारी करण्यास सांगण्यात आले. मुनिकृष्णा, ज्याने अनेक वर्षांपूर्वी गावातील एक साधा शेतगडी म्हणून काम सुरू केले होते आणि आता सर्व बांधकामाच्या कामासाठी गुरुजींचा विश्वसनीय सहाय्यक बनला होता, त्याने अगदी तंतोतंत सगळी व्यवस्था केली, जशी त्याच्या अनुभवी व विश्वासू मार्गदर्शकाने सुचवली असती. स्वयंसेवक येऊन पोहोचले होते आणि सन्मानपूर्ण मौनाने तपोनगराने गुरुजींचे स्वागत केले.

अंतिम दर्शनाची व्यवस्था कॉस्मिक टॉवरच्या बाहेर करण्यात आली होती. इतर शहरांतून आलेल्या पाहुण्यांना श्रद्धांजली अर्पण करता यावी म्हणून ही सेवा अखंड तीस तास चालू राहिली. मुंबई, दिल्ली, पुणे, चेन्नई आणि इतर शहरांतून अनेकजण त्वरित निघून आले. स्थानिक गावकऱ्यापासून वरिष्ठ दर्जाचा मंत्री, ध्यानसाधक विद्यार्थी ते परिचितांपर्यंत आदरांजली अर्पण करण्यासाठी आलेल्या प्रत्येकाने त्यांच्या भावना भावपूर्ण अश्रू आणि आदरयुक्त नि:शब्दतेने प्रकट केल्या. समर्पणाच्या भावनेने ध्यानात बसले असता अनेकांना गुरुजींच्या शरीरातून प्रकाश आणि आशीर्वादांच्या लहरी बाहेर निघत असल्याचे जाणवले. प्रत्येकाला त्यांचे शरीर सजीव असल्यासारखे वाटत होते. जणू कोणत्याही क्षणी ते जागे होतील असे वाटत होते. अंत्यक्रियेच्या आधीच्या संपूर्ण रात्री स्वयंसेवकांनी गट करून पाळीपाळीने त्या पवित्र जागेची राखण केली. स्वयंपाक करण्याच्या मन:स्थितीत कोणीच नव्हते तरीही काही रहिवासी गृहिणींनी आयत्यावेळी आयोजन करून सर्व तपोनगरवासियांसाठी साधेसुधे रात्रीचे जेवण तयार केले. एका मोठ्या परिवाराप्रमाणे प्रत्येकाने दुसऱ्यास आधार दिला. योगायोगाने, तयार केलेल्या पदार्थांमध्ये एक पदार्थ गुरुजींच्या आवडीचा होता.

या संपूर्ण वेळात काही स्वयंसेवक, मुनिकृष्णा आणि गावातील त्याला मदत करणाऱ्यांचा एक गट तपोवनाचा एक भाग पवित्र चितेसाठी तयार करत होते.

अंत्यक्रिया दुसऱ्या दिवशी मध्यान्ही १२ वाजता करण्याचे ठरले होते म्हणून सकाळी ११.३० वाजता शवयात्रा गंभीरतेने तपोवनाकडे निघाली. वक्तशीरपणा गुरुजींच्या महत्त्वपूर्ण शिस्तींपैकी एक होता आणि त्याचे काटेकोरपणे पालन करण्यात आले. पवित्र चितेच्या संरक्षणार्थ घातलेल्या कुंपणाच्या आजूबाजूच्या जागेत शेकडो लोक जमले होते. आदल्या दिवशी पाऊस पडून गेला होता. म्हणून निसर्गाने आमचे तीव्र दु:ख कमी करण्यासाठी वातावरण बिनपावसाचे आणि तरीही ढगाळ ठेवून सांत्वन केले. कोणतेही धार्मिक विधी न करता अंतिम संस्कार साध्या आणि प्रभावशाली रीतीने करण्यात आले. या पुढील काही तास पूर्णत: सन्मानपूर्वक शांतता होती. जसजसा चितेतील ज्वालांनी जोर धरला तसतसे गुरुजींचे भौतिक शरीर तपोनगरात कायमचे विलीन झाले.

दुसऱ्या दिवशीच्या रविवारच्या वर्गासाठी मेडिटेशन हॉल, डायनिंग हॉल, ऑफिस आणि आजूबाजूच्या आवाराची साफसफाई आणि तयारी करायची होती. थकले असूनही काम करण्यास तयार स्वयंसेवकांनी स्वत:चे अश्रू पुसले आणि स्मितहास्याने स्वत:स कामात झोकून दिले. पुढे चार दिवसानंतर पवित्र रक्षा गोळा करता येणार होती म्हणून तपोनगरवासियांनी हिवाळ्यातील कडक थंडीच्या रात्रीत देखील पहारा दिला. ताऱ्यांच्या खाली, त्यांच्या गुरूच्या शेजारी ते ध्यानास बसले.

एखादे बीज त्याच्यापासून बहरलेली फुले कधी पाहू शकत नाही. परंतु प्रत्येकाला गुरुजी त्यांच्या हृदयात राहून सक्रियपणे प्रत्येक तपशीलाकडे लक्ष देऊन पाहत असल्यासारखे जाणवले. प्रत्येकाने, त्यांनी सबुरीने शिकवलेल्या एकोप्याचे, सहकार्याचे, शांतपणाचे आणि ऋषींच्या प्रती निष्ठापूर्वक सेवेचे प्रकटीकरण केले. ■

## प्रकाश प्रवहनाची जागतिक चळवळ

ही आपल्या अंत:करणाची चळवळ आहे. ह्या जगाला प्रेम व शांतीने परिपूर्ण अशी सुंदर जागा बनविण्यासाठी ही चळवळ आहे. एक अशी चळवळ जिच्यात प्रवचने नाहीत की घोषणा फलक नाहीत. एक अशी चळवळ जिच्यामध्ये प्रकाश उच्च जगातून प्रवाहित करून पृथ्वीतलावर आणणे व पसरवणे एवढेच पुरेसे आहे. प्रकाशाला प्रवाहित करा. मग शब्द जे करू शकत नाहीत ते सर्व तो प्रकाशच करेल.

आपण जेव्हा प्रकाश प्रवाहित करून पसरवतो तेव्हा तो इतरांच्या हृदयांत व घरात प्रवेश करतो आणि त्यांच्या भावना व विचारांत असलेल्या अंध:काराला दूर करतो. त्यामुळे माणसांत परिवर्तन घडते. माणसांमधील परिवर्तनामुळे जगात परिवर्तन घडते आणि ते प्रकाशमय बनते.

हा चर्मचक्षूंना दिसणारा साधा प्रकाश नसून शक्तीच्या गाभ्यापासून येणारा अतिसूक्ष्म प्रकाश आहे. या मूलस्त्रोतातूनच सर्व सृष्टीचा जन्म झाला. ह्या प्रकाशाजवळ सर्व काही आहे: शक्ती, विवेक आणि उज्वल भविष्य. आणि तो अदृश्यपणे सर्वत्र वास करून आहे.

आपण चॅनलिंग म्हणजे प्रवहन करून ह्या प्रकाशाला पृथ्वीवर आणून सर्वत्र पसरवूया. रोज सकाळी उठल्यावर आणि रात्री निजण्यापूर्वी ७ मिनिटे आपण हे करून ह्या जगाचे परिवर्तन करूया.

ह्या जागतिक चळवळीची सुरुवात १८-०५-२००८ रोजी तारामंडळीय परिषदेने म्हणजेच सप्तर्षींनी गुरुजी कृष्णानंदांच्या मार्फत केली.

हा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवा.

वेब साईट : www.lightchannels.com

## शंबला तत्त्वे

**ही प्राचीन ऋषींनी दिलेली सात तत्त्वे आहेत ज्यांचे पालन शंबला या पृथ्वीवरील प्रकाशाच्या नगरीत राहाणारे लोक करतात. हे लोक चिरतरुण असून शांती व परिपूर्णतेचे जीवन जगतात.**

१. तुमच्या अंतरंगातील प्रकाशाचा अनुभव घेऊन सभोवताली पसरवा.

२. प्रेमाचा अनुभव घ्या आणि प्रेम सर्वत्र पसरवा.

३. प्रत्येक जीवामध्ये आणि प्रत्येक वस्तूमध्ये जीवनाच्या एकात्मतेचा अनुभव घ्या.

४. दैनंदिन कामे करण्याआधी प्रथम त्यांची मनात उजळणी करा, नंतर हळू आवाजात त्यांचे शब्दांकन करा आणि नंतरच ती कृतीत उतरवा.

५. कोणतेही ध्येय पूर्ण होण्याआधी त्याविषयी कमीत कमी बोलून गुप्ततेचा नियम पाळा.

६. नकारात्मकतांशी लढा देण्यासाठी शरीर, मन आणि बुद्धीला चालना द्या.

७. उच्च आध्यात्मिक ध्येये गाठण्यासाठी स्वत:हून आपल्या लौकिक गरजांची मर्यादा ठरवा.

# श्री जयंत देशपांडे यांच्या रविवारच्या व्याख्यानांतील वेचे

(संकलन : शोभा राव ; अनुवाद : पूर्णिमा परुळेकर)

०४-११-२०१२

खरा गुरु मनुष्यलोकाचे सर्व नियम पाळतो व त्याबरोबरच उच्च लोकांतील नियमांचेही पालन करतो. त्याच्याकडे येणाऱ्या कोणाही माणसाला तो मार्गदर्शन करतो व आपले प्रेम देतो.

एकदा गुरुजी सहज बोलून गेले, 'मी अनेक क्रूस घेऊन फिरतो.' एका परीने आपण सर्वजण तोपर्यंत त्यांचे क्रूस आहोत जोपर्यंत आपण आपापले क्रूस घेऊन चालायला शिकत नाही. एकदा ते येशूंबरोबर मानसिक संपर्कात असताना येशू म्हणाले, 'जेव्हा केव्हा एक माणूस दुसऱ्याला फसवतो तेव्हा तो मला क्रूसावर चढवतो.' आपण क्षणभर थांबून प्रामाणिक आत्मपरीक्षण करावे आणि चुकीचा मार्ग सुधारावा.

गुरुजींनी आपल्याला सांगितले की आपण एकटे असताना आपल्या मनात जे चालते ते फार महत्त्वाचे आहे. ते आपली आध्यात्मिक अवस्था दर्शवते.

रहिवाशांच्या बैठकीत गुरुजींनी आम्हाला सांगितले की आपल्या आयुष्याच्या प्रत्येक अंगात चढउतार येतात. ही स्वाभाविक गोष्ट आहे. आपली जर देवावर श्रद्धा असेल, तो आपल्यावर प्रेम करतो हे जर आपल्याला माहीत असेल तर आपण कोणत्याही गोष्टीचा स्वीकार करू शकतो. ते असेही म्हणाले की अमुक गोष्ट आध्यात्मिक आणि तमुक ऐहिक असा भेदभाव नसतो.

एक प्रश्न असा विचारला गेला, 'ऋषी विनाश घडवतात का?' आपल्याला विकास करून परिवर्तन करण्यास मदत व्हावी या हेतुने ऋषींनी अपरंपार ज्ञान दिले आहे व ऊर्जा दिल्या आहेत. आपण जेव्हा परमार्थनिष्ठ होऊ तेव्हा विनाशाची गरज उरणार नाही.

गुरुजी म्हणतात की ध्यान ही गंभीर साधना आहे; ती एक जीवनपद्धती आहे जिच्या योगे आपण मुक्ती मिळवतो, जीसुद्धा गंभीर गोष्ट आहे. दीक्षाविधी तर त्याहूनही फार गंभीर आहे. ऋषी हजारो वर्षे तपाला बसतात, तपातून शक्ती मिळवतात आणि दीक्षेदरम्यान ती साधकाकडे वळवतात. तपातून प्राप्त झालेली शक्ती संपल्यावर शक्ती मिळविण्यासाठी ते पुन्हा तपाला बसतात. त्यामुळे दीक्षाविधी ही अतिशय पवित्र गोष्ट आहे.

ध्यान करत असताना आपली जाणीव विस्तारते. जाणिवेचा हा विस्तार आपण जीवन जगत असताना सर्व पातळ्यांवर व्यक्त होऊ दिला पाहिजे. हाही साधनेचाच भाग आहे. असे करण्याने प्रत्येक वेळी ध्यान करताना जाणीव आणखी व्यापक होण्यास आपल्याला मदत होते. आपला अंतर्गत व बाह्य जीवनातील व्यापकपणा परस्परांशी जोडलेले असतात.

ध्यानामध्ये आपण चक्रांचे अवधान ठेवायचे असते. आपण त्यांना पाहण्याची गरज नसते. आपल्याला माहीत आहे की ऋषींची कृपा चक्रांना जागृत करते आणि आपल्याला प्रकाशाचा अनुभव घेण्यात देखील मदत करते.

गुरुजी सांगतात की कष्ट आणि अपयश ही ह्या पृथ्वीची खास वैशिष्ट्ये आहेत. अशा गोष्टींचा अनुभव घेण्यासाठी इतर ग्रहांवरील माणसे इथे जन्म घेतात.

कोणीतरी विचारले, 'आम्ही एखादी गोष्ट जर मनापासून केली नाही तर त्यामुळे आमचे कर्म तयार होईल का?' गुरुजी म्हणाले, 'कर्म तयार होईल असे आपण सांगू शकत नाही, पण पारमार्थिक दृष्ट्या तसे करणे योग्य नाही. आपण जे काही करू ते संपूर्ण प्रामाणिकपणे केले पाहिजे.'

गुरुजींनी मला तुम्हाला सांगायला सांगितले आहे की ते इथे आले किंवा न आले तरी तुम्ही ऋषींचे अनुसरण करा. सर्व तत्त्वांचे पालन करा. ते असेही म्हणाले, 'सूक्ष्म पातळीवरून मी वैयक्तिकरीत्या तुमच्याकडे लक्ष देईन.' त्यांचे शरीर प्रेमाने, आपल्या विषयीच्या काळजीने व कळकळीने कंप पावत होते. आपणही त्याच कळकळीने व प्रामाणिकपणाने त्यांना प्रतिसाद देऊया.

११-११-२०१२

ज्या गोष्टी अयोग्य आहेत हे आपल्याला समजले आहे त्यांचा त्याग करण्याची व ज्या गोष्टी योग्य आहेत हे आपण जाणले आहे त्या आचरणात आणण्याची ही वेळ आहे. स्वतःला व इतरांना माफ करण्याची व पुढे वाटचाल करण्याची ही वेळ आहे.

गुरुजी हे साक्षात्कारी गुरु आहेत आणि त्यांचा भूतकाळ ते सहज जाणू शकतात. परंतु, ते संपूर्ण समर्पणाच्या अवस्थेत जगतात.

आपणा सर्वांप्रमाणे गुरुजींनी देखील प्रार्थना केली. पण त्यांना जेव्हा काही सकारात्मक फायदा झाला नाही तेव्हा हीच ईश्वरी इच्छा आहे असे मानून प्राप्त परिस्थितीचा त्यांनी पूर्ण आदरपूर्वक व संपूर्णतया स्वीकार केला. आपण जर हे आपल्या आयुष्यात लागू करू शकलो तर आपले आयुष्य अत्यंत शांतीमय व आनंदमय होईल.

गुरुजी म्हणतात, 'तुम्ही बाहेर पाऊल टाकता तेव्हा आकाशाकडे पाहा. त्याच्या सौंदर्यात असे काहीतरी आहे जे आपल्याला वरच्या पदावर नेते. आपण तो अनुभव घेतला तर आपण संकुचित विचार करणे थांबवू.'

एका अनौपचारिक बैठकीत गुरुजी म्हणाले, 'तुम्ही समोरच्या माणसाचा, त्याच्या किंवा तिच्या गुणदोषांसह संपूर्ण स्वीकार केला पाहिजे. आपल्या भावनिक मागण्यांच्या रेट्याखाली आपण इतरांना गुदमरवून टाकता कामा नये. तुम्ही मानवी नाती यथार्थपणे सांभाळू शकलात तर ती तुमच्या आध्यात्मिक प्रगतीची खूण आहे.' गुरुजी आपल्यामधली बलस्थाने व उणीवा टिपतात आणि आपण आपल्या चुकांची व उणीवांची दखल घेऊन त्यावर मात करण्याची प्रतीक्षा करतात. कोणावर एखादी जबाबदारी सोपवल्यावर ते कधीही त्याविषयी चौकशी करत नाहीत. त्यांना आपल्याबद्दल आदर व आपल्यावर पूर्ण विश्वास आहे.

एखाद्या माणसामधील दुर्गुणाशी आपला जेव्हा संबंध येतो, आपण त्या माणसाला सुधारण्याचा प्रयत्न करतो किंवा त्याविषयी नाराजी व्यक्त करतो तेव्हा आपल्यात दुरावा निर्माण होतो, भांडण होते. मी हेही पाहिले आहे की मुले आपल्या खरडपट्टीतून व भाषणबाजीतून विशेष शिकत नाहीत. पण

## श्री जयंत देशपांडे यांच्या रविवारच्या व्याख्यानांतील वेचे

(संकलन : शोभा राव ; अनुवाद : पूर्णिमा परुळेकर)

आपण कसे वागतो ते पाहून ती शिकतात.

‘खरा पारमार्थिक अनुभव बिनशर्त प्रेम प्रकट करण्यात माणसाची मदत करू शकतो का? ; जर बिनशर्त प्रेम प्रकट करणे आम्हाला जमू शकले तर त्यायोगे आम्हाला सच्चा पारमार्थिक अनुभव येईल का?’ ह्या प्रश्नांना गुरुजींनी उत्तर दिले, ‘दोन्हींची उत्तरे होय अशी आहेत.’

१८-११-२०१२

गुरुजींचा उत्साह आणि जीवनावरचे त्यांचे प्रेम यांची प्रशंसा करावी तितकी थोडी आहे. अत्यंत अशक्त झाले असताना देखील ते तपोनगरातील दिवाळीच्या उत्सवास आले. ते म्हणाले की कोणत्याही परिस्थितीत जीवन सुरू राहिले पाहिजे.

गुरुजींना जेव्हा समजले की त्यांना कर्करोग झाला आहे तेव्हा ते म्हणाले, ‘जर देवाच्या अनुमतीने हे घडले आहे तर मला हे मान्य आहे.’ ते पूर्णपणे जाणत होते की देव त्यांच्यावर आणि प्रत्येकावर प्रेम करतो.

गुरुजी म्हणाले की डॉक्टरांना प्रकाशाचे प्रवाहक मानून त्यांनी स्वतःला पूर्णपणे डॉक्टरांच्या स्वाधीन केले. त्यामुळे प्रकाशाला डॉक्टरांच्या माध्यमातून काम करता आले. जीवनाच्या प्रत्येक तपशीलाला विनम्र समर्पण हे तर आपल्या गुरुजींचे वैशिष्ट्य होते.

मी पाहिले आहे की गुरुजी जिथे भेट द्यायचे त्या जागेचे सौंदर्य त्यांना बरोब्बर दिसायचे आणि ते त्याची प्रशंसा सुद्धा करायचे. ते म्हणायचे की आपण जगातील चांगले पाहिले पाहिजे.

हॉस्पिटलमधील त्यांच्या अखेरच्या दिवसांत ते सुंदर मुद्द्यांवर बोलले. ते म्हणाले की त्यांना वाटते की सर्वांना हे समजावे की ते बदलू शकतात; ते हसू शकतात आणि ते प्रेम करू शकतात. ते म्हणाले, ‘कोणत्याही व्यक्तीविषयी वाईट विचार करू नका. अशा सर्व क्षुल्लक गोष्टी सोडून देऊन उच्च पातळीवर जाण्याची ही संधी आहे. ही जागा शाळेप्रमाणे आहे. इथे आपण शिकतो, अर्थ समजून घेतो.’ ते म्हणाले की हॉस्पिटलमधल्या चांगल्या लोकांच्या माध्यमातून ईश्वरी कृपा त्यांना मदत करते आहे. ईश्वर नेहमीच आपल्या सोबत असतो. ते म्हणाले, आपण कृती करण्याआधी देव स्वतःचे मत देतो व आपल्याला त्याचे पालन करण्यास सांगतो. परंतु, आपल्याला इच्छास्वातंत्र्य असल्यामुळे आपण त्याचे पालन करतोच असे नाही. हे सत्य आहे.

ते पुढे म्हणाले, ‘ईश्वर सर्वांची काळजी घेतो. ईश्वराला समजून घेण्याची ही वेळ आहे. ईश्वर हे सर्वात महत्त्वाचे वैश्विक सत्य आहे. लोक त्याला समजू शकत नाहीत. त्यामुळे त्यांना झगडावे लागते. आपण ईश्वराचा स्वीकार केला पाहिजे. तो आपला निर्माता आहे. हे जग सुंदर आहे. आपण ऋषींसोबत आहोत. आपण ईश्वराला जाणले पाहिजे. लोक आध्यात्मिक प्रगतीच्या निरनिराळ्या टप्प्यांमध्ये आहेत. आपण त्यांना विकासासाठी अवधी दिला पाहिजे. गुरुजी म्हणाले की गुरुप्रती सर्वोत्तम योगदान कोणते असेल तर ते आहे गुरुला समजून घेणे व त्याची शिकवण आचरणात आणणे.

ते पुढे म्हणाले, ‘ईश्वर माझ्या माध्यमातून तुम्हाला सांगतो आहे की आपण मानवी गुरुच्या माध्यमातून नेहमीच त्याच्याशी जोडलेले असतो. गुरु ऋषींशी व ऋषी ईश्वराशी जोडलेले असतात. अशा तऱ्हेने ईश्वर सदासर्वदा प्रत्येकाशी जोडलेला असतो. हे केवढे मोठे तथ्य आहे! प्रेम जगातील प्रत्येक गोष्टीचा पाया आहे. संपूर्ण सृष्टी प्रेमातून उत्पन्न झाली. प्रेम सर्व गोष्टींची काळजी घेते. मला वाटते की सर्वोच्च स्तरावर फक्त प्रेमच असावे.’ ते म्हणाले, ‘माझी इच्छा आहे की प्रत्येकाने त्या उच्च स्तरावर पोचावे आणि ह्या गोष्टी जाणाव्या.’ शेवटी ते म्हणाले, ‘Doorways to Light’ पुन्हा वाचा. तुम्हाला अनेक गोष्टी समजतील.

२५-११-२०१२

गुरुजी त्यांच्या भौतिक देहात इथे आपल्या सोबत नाहीत यावर विश्वास ठेवणे फार कठीण जाते आहे. त्यांच्या दैहिक उपस्थितीचे आपल्यासाठी फार महत्त्व होते. प्रत्येकजण जरी त्यांच्याशी वैयक्तिकरीत्या बोलू शकला नाही तरी ते तिथे आहेत या नुसत्या जाणिवेने खूप मोठा फरक पडत असे. त्यांचा संदेश सोपा होता. ऋषींचे अनुसरण करा. ‘त्यांनी आपल्याला जे जे शिकवले ते जास्तीत जास्त आत्मसात करण्याचा आणि जाणीवपूर्वक आपल्या जीवनात उतरवण्याचा आपण प्रयत्न करूया.’

गुरुजी म्हणाले होते, ‘संजीवक ऊर्जा मला मदत करत आहेत.’ ते म्हणाले, ‘देवा, मला खूप काही मिळाले आहे. आराम पडला आहे. नाहीतर हे हाताळणे जड गेले असते.’ ते म्हणाले की संजीवक ऊर्जांनी कर्मे नष्ट होणार नाहीत, त्यांना ती भोगूनच संपवावी लागतील. गुरुजींनी त्यांच्याकडे येणाऱ्या सर्वांना त्यांच्या दुःखाच्या व संकटांच्या वेळी अत्यंत आवश्यक असा आधार व दिलासा दिला. असे करताना पीडितांच्या कर्मांचा काही भाग त्यांनी स्वतःवर घेतला. अत्यंत तरुण वयापासून इतरांच्या कर्मांचा भार ते स्वतःवर घेत आले आहेत.

गुरुजींनी हॉस्पिटल प्रकाशाने भरून टाकले होते. त्यांना मदत करणाऱ्या व्यक्तींविषयीच्या कृतज्ञतेने त्यांचे हृदय भरून गेले होते. त्यांना तिथे असलेल्या सर्वांना, सर्व रोग्यांना मदत करायची होती. त्यांनी त्या सर्वांना ऊर्जा पाठवल्या.

एकदा गुरुजींनी उल्लेख केला होता की जर अशी एखादी जागा किंवा परिस्थिती असेल जिथे आशेला मुळीच वाव नाही तर ते अशा ठिकाणी जात व आशा निर्माण करत. कदाचित आता कुठेतरी अशीच काहीशी परिस्थिती उद्‌भवली असेल आणि गुरुजींची उपस्थिती तिथे आवश्यक असेल. पृथ्वीतलावर त्यांनी आणलेले ज्ञान आणि ऊर्जा येणाऱ्या अनेक पिढ्यांना मदत करतील. ते नेहमी म्हणायचे, ‘आपल्याला मुळीच घाई करायला नको. आपण संपूर्णपणे सावकाश समजून घेऊ.’

त्यांच्या अखेरच्या दिवसात गुरुजी अत्यंत आनंदी व शांत होते. त्यांनी मला सांगितले की सर्व विद्यार्थ्यांना सांगा की ते त्यांच्यावर प्रेम करतात आणि हे शब्द त्यांच्या हृदयातून येत होते. ते खूपच अशक्त झाले होते, परंतु त्यांच्यामधला मानवी अंश शाबूत आणि सचेतन होता. त्यांच्या चेहऱ्यावर सर्वांसाठी तेच प्रेमळ हास्य होते, जे हास्य त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य घटक होते. त्यांच्यापासून ते विभक्त होऊच शकत नव्हते. ■

## बाहेरील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन

जे प्रत्यक्ष ध्यानवर्गात येऊ शकत नाहीत, त्यांच्यासाठी पोस्टाद्वारे किंवा ई-मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. इंग्रजीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क २००० रू. व कन्नड, मराठी आणि हिंदीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क १००० रू. आहे.

वार्षिक शुल्कात पाठ्यपुस्तकांची किंमत आणि आमच्या कुठल्याही एका भाषेतील मासिकासाठी वार्षिक वर्गणी समाविष्ट आहे.

- सर्व सूचना पोस्टाद्वारे किंवा इ-मेल द्वारे (विद्यार्थ्यांनी निवडल्याप्रमाणे) नियमित पाठवण्यात येतात.
- ऋषी स्वतः सूक्ष्मदेहाने दीक्षा देतात. आपल्या प्रगतीचे निरीक्षण सुद्धा ते सूक्ष्मदेहाने करतात.
- सगळ्या शंका व प्रश्नांची उत्तरं श्री. जयंत देशपांडे देतात.
- मराठीत लिहिलेल्या पत्रांची उत्तरं श्री. जयंत देशपांडे देतात.
- मार्ग आणि साधना नीट समजून घेण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी आमच्या पाठ्यपुस्तकांचा आणि आमच्या इतर प्रकाशनांचा सखोल अभ्यास करावा.
- साधनेचा अहवाल आम्ही सांगितलेल्या पद्धतीने वेळेवर पाठवावा. अहवाल जर वेळेवर मिळाला नाही तर विद्यार्थ्याने ध्यान करण्याचे थांबवले आहे असे समजले जाईल.

चेक/ड्राफ्ट "Manasa Light Age Foundation Bangalore" च्या नावाने काढावा.

## गुरुजींकडून विशेष सूचना

- विद्यार्थ्यांनी धैर्य ठेवावे. पहिल्याच दिवशी समाधीचा अनुभव होईल, अशी अपेक्षा ठेवू नये! चमत्कारांची अपेक्षा ठेवू नये. जेव्हा आपण प्रामाणिकपणे साधना करतो तेव्हा शांतपणे चमत्कार घडतात, हे सुद्धा मात्र तेवढेच खरे आहे.
- प्रत्येकासाठी अडथळे वेगवेगळे असतात. सतत अभ्यासाने अडथळे नाहीसे होतात.
- प्रत्येकाचेच अनुभव खास असतात. तरी त्यांना खूप महत्त्व देऊ नये. ध्यान करतांना झालेले हे अनुभव छान असतात पण ते आपल्या आध्यात्मिक प्रगतीचे प्रमाण दाखवीत नसतात.
- ध्यान करतांना कार्यान्वित झालेल्या प्रक्रियांचे विश्लेषण करू नये. तसे केल्याने स्तब्धता किंवा शांतता प्रस्थापित करता येत नाही.
- ध्यान करतांना विचारांची गर्दी ही सर्वांचीच समस्या आहे. त्याबद्दल काळजी करू नये. विचारांना दूर करण्याचा प्रयत्न सुद्धा करू नये. फक्त त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे. दुसरा कुठलाच उपाय नाही.

## गुरुजी

उषा सतीशचंद्र, अनुवाद : सुनिता देशपांडे

ज्यांच्याशिवाय माझ्या जीवनाची मी कल्पनाही केली नव्हती, अशा व्यक्तीबद्दल लिहायला बसले असता, माझे मन भावनामय झाले आहे आणि माझे शब्द माझ्या भावना पूर्णतः व्यक्त करण्यात अपयशी ठरत आहेत. जे शब्द ते बोलले, जे त्यांनी शिकवले, ते त्यांच्या काळापेक्षा अतिशय पुढील काळाचे होते, तरीपण ते व्यावहारिक होते आणि आजच्या काळासाठी योग्य असेच होते. ते नेहमी व्यावहारिकपणे, समंजसपणाने जगण्यात आणि योग्य प्रमाणात भावनांना व्यक्त करण्यावर विश्वास ठेवत असत. माझ्यासाठी ते जीवनाचे मूर्तिमंत स्वरूप होते आणि नेहमीच राहतीलही !! त्यांनी जीवनातील प्रत्येक क्षण फक्त स्वीकारलाच नाही तर तो साजरा ही केला. एखादी व्यक्ती, तिची पार्श्वभूमी काहीही असली, तिचे संगोपन कसेही झालेले असले, तरीही तिच्या सतत प्रयत्नांनी आणि शुद्ध इच्छेने, प्रगती करून अलौकिक गौरवशाली मानव होण्याचे शिखर कशी गाठू शकते, ह्याचे ते जिवंत उदाहरण होते. मी स्वतःतरी माझ्या पूर्ण आयुष्यात, ऋषींप्रती, त्यांच्या कार्याप्रती आणि आपल्या गुरुंप्रती एवढी प्रचंड समर्पणवृत्ती, इतके प्रेम आणि आदरभाव बाळगणारी दुसरी अशी कोणतीही व्यक्ती पाहिली नाही. आम्ही लहान असताना महर्षी अमरांबद्दल आम्हाला बऱ्याच गोष्टी सांगण्यात आल्या होत्या. जरी आम्ही त्यांना कधी भेटू शकलो नाही तरी आम्हाला याचा आनंद आहे की अगदी महर्षी अमरांसारखे जीवन जगणाऱ्या व्यक्तीला पाहत पाहतच आम्ही मोठे झालो.

गुरुजी त्यांच्याकडे येणाऱ्यांचे, मग ते कोणीही असोत, रक्षण करत आणि त्यांची काळजी घेत. मला ह्याची खात्री आहे की जीवनात कोणत्या ना कोणत्या प्रसंगी त्यांनी केव्हा न केव्हा आपले रक्षण केले आहे आणि आपल्याला वाचवले आहे. आणि याची मला पूर्णपणे खात्री आहे की यापुढे सुद्धा नेहमीच गुरुजी आपले संरक्षण करत राहतील आणि आपल्याला मार्गदर्शनही करतील. ऋषींनी एकदा हे उघड केले होते, की गुरुजी एकेकाळी एक महान फेरो (प्राचीन इजिप्तचे महान राजे) होते. माझ्यासाठी तर ते या जन्मातही एक महान फेरो होते. त्यांच्या जगण्यातून, प्रत्येक कृतीमधून, विचार आणि शब्दांतून ते प्रतिबिंबित होत असे. ते नेहमीच एक महान फेरो राहतील !! ■

## माझ्या जीवनातील गुरुजी

पद्मजा बालाजी, अनुवाद : सुनिता देशपांडे

माझ्या जिवलग चिरंतन गुरुजींना जेव्हा मी पहिल्यांदा भेटले तेव्हा मी एक लहान पोर झाले आणि रडले. आणि ज्या प्रकारे त्यांनी माझी आणि पवित्रते मधील प्रकाश वर्षांची दूरी दूर केली त्यावर मी पुढच्या आठवडाभर रडतच राहिले. त्यांच्यापासून कोसो दूर असून मी त्यांना देवदूतांबद्दल, कबूतरांबद्दल, मस्तवाल बैलांशी झुंज घेणाऱ्या वीरांबद्दल, स्वप्नांबद्दल, पुस्तकांबद्दल, कवितांबद्दल, नुकसानीबद्दल, निर्णयांबद्दल आणखी कितीतरी गोष्टींबद्दल लिहिले. आणि त्यांनी त्यांच्या नर्म विनोदाने, विवेकाने, प्रेम आणि ऊर्जासह न कंटाळता माझ्या पत्रांची उत्तरे दिली. लाडप्रेमाने भरलेली त्यांची उत्तरे वाचून मी तासन्तास शांतपणे अश्रु गाळण्यात घालवले, असे जर मी म्हणेन तर ती अतिशयोक्ती होणार नाही. एकाच वेळी प्राचीन आणि नवजात असण्याची अनुभूती काय असते हे मला दाखवणारे तेच होते. प्रत्येकाला विशेष समजून त्यांच्याशी कसे वागावे हे शिकण्यासाठी गुरुजींबरोबरची एकच भावपूर्ण भेट पुरेशी आहे.

जेव्हा मी गुरुजींना दुसऱ्यांदा भेटले, तेव्हा त्यांच्याशी बोलत असताना मी घड्याळाकडे पाहिले कारण, शंबला वर्गाला जाण्याकरिता फक्त ५ मिनिटे उरली होती. काळजी करू नको असे म्हणत गुरुजींनी मला आश्वस्त केले. मला जी भीती होती, त्याप्रमाणेच शंबला वर्ग उशीरा सुरू झाला आणि सुरवातीच्या काही तंत्रांचा सराव वगळावा लागला. त्यांनी वर्गात जे सांगितले ते ऐकून मला तर धक्काच बसला... भगवान मैत्रेय प्रमुख म्हणून राहणार होते पण शेवटच्या क्षणी कलकी देवांनी येण्याचे ठरवले; आणि वेळेवर तेथे पोहचून वाट पाहत असणाऱ्या कलकी देवांची गुरुजींनी माफी मागितली. जेव्हा मी त्यांना अश्रुपूर्ण दिलगिरी व्यक्त करणारे पत्र लिहिले तेव्हा त्यांनी मला लिहिले की काळजी करण्याचे कारण नाही कारण कलकी देवांनी त्याबद्दल मनाला लावून घेतले नाही !

त्यांची अनुपस्थिती मला प्रकर्षाने जाणवते, आणि नाही पण, कारण त्यांच्या चितेतील धगधगणारा निखारा ज्याची मी साक्षी होते तो माझ्या हृदयात लागलीच कुजबुजला की त्यांचा प्रकाश आणि त्यांचे जीवितकार्य – 'मी कार्यासाठी जगेन. मी ऋषींसाठी कार्य करेन. मी जगासाठी स्वप्न पाहीन.' – मी मनात बाळगावे. 'सर्व ऋषी अमर आहेत!', त्यांचे हे शब्द आठवून मी सुद्धा मनात एक गुप्त इच्छा जोपासते आहे. ■

## ते परत गेले

ब्रजबंधु मिश्रा, अनुवाद : सुनिता देशपांडे

गुरुजी नेहमी म्हणत असत, "मी परत जाण्यासाठी तयार आहे. जेव्हा कधी ऋषी बोलावतील, मी जाईन." ऋषींनी त्यांना रविवारी हाक दिली आणि शुक्रवारी ते आपल्याला सोडून गेले सुद्धा. ते असे होते ज्यांच्यावर आपण सर्वात जास्त प्रेम केले. ते या पृथ्वीवरील सर्वोत्तम व्यक्ती होते. ते मनुष्य देहधारी साक्षात प्रेमच होते. त्यांनी प्रत्येकावर समान आणि पराकोटीचे प्रेम केले आणि आदर दिला.

ते आपल्याला म्हणत असत, "जे तुमच्या पुढ्यात येईल त्याला ईश्वराची भेट म्हणून स्वीकारा." त्यांच्या शारीरिक व्याधीला देवाची देणगी म्हणून स्वीकारून त्यांनी तसे करूनही दाखवले. त्यांनी आपल्याला शिकवले, "प्रेम करा, स्वीकार करा, जीवन साजरे करा, तक्रार करू नका, कुरकुर करू नका." त्यांनी त्यांचे जीवन त्यांच्या शेवटच्या श्वासापर्यंत साजरे केले.

ही निश्चितच गुरुजींची कृपा आहे जिच्यामुळे आपला त्यांच्याशी संबंध आला. त्यांचे सर्व विद्यार्थी खरोखरंच भाग्यवान आहेत. आपण खरंच एका महात्म्यासोबत जगलो आणि एका महात्म्यासोबत चाललो ! ■

## गुरुजी

उषा सतीशचन्द्र, अनुवाद : सुनिता देशपांडे

प्रत्येकवेळी आपण गुरुजींना भेटलो तेव्हा मनात खोलवर रुजलेल्या आपल्या इच्छा, आपली स्वप्ने उलगडली, योग्य मशागत होऊन हंगामास आली व फलद्रूप झाली. त्यांनी त्यांच्यातील दिव्यत्वाची व मनुष्यत्वाची अतिशय मार्मिकतेने व नजाकतीने सांगड घातली होती. आपल्याला त्यांच्याशी नेहमी, सर्व पातळ्यांवर संबंध जोडता यावा यासाठी ते, हळुवारपणे व संयमाने आपल्याला मार्गदर्शन करत असत.

सृष्टीजवळ जे काही आहे ते सर्व त्यांच्या जीवनपद्धतीतून, शिकवणुकीतून, दिव्यतेतून व विनम्रतेतून प्रकट करून, प्रकाशयुगात आपल्या प्रवेशासाठी मार्ग त्यांनी घडवला. त्यांच्या निरपेक्ष प्रेमाने, त्यांच्या कमी न होणाऱ्या प्रकाशाच्या प्रभामंडळात आपल्याला सामावून घेतले आहे. आपल्या अस्तित्वाच्या गाभ्यात खोलवर ते कोरले गेले आहेत. ते आपल्यामध्ये जीवित आहेत आणि आपण त्यांच्या तत्त्वांप्रमाणे जीवन जगतो आहोत. त्यांच्या मोहक स्मितहास्याने, त्यांच्या भव्य व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावामुळे अवाक् झाल्याशिवाय कोणी राहूच शकत नाही. एक आध्यात्मिक मार्गदर्शक, एक द्रष्टा, सर्व जगासाठी स्वप्न पाहणारे आणि चिरंतन गुरू – असे होते आपले गुरुजी ! ■

## माझे आध्यात्मिक पिता

वैशाली जोशी, अनुवाद : सुनिता देशपांडे

जीवनात एकेवेळी जेव्हा मला निराधार झाल्यासारखे वाटत होते तेव्हा एक नवे दार उघडले आणि देवाने गुरुजींना, माझ्या आध्यात्मिक पित्याला माझ्या जीवनात आणून माझ्यावर त्याच्या कृपेचा वर्षाव केला. एक असा प्रेमळ पिता त्याने मला दिला ज्याने मला अगणित संधी तर दिल्याच पण त्याच सोबत संयमाने मला माझे धडे माझ्या गतीने शिकू दिले आणि मला जीवन शांतीने आणि संतुष्टपणे जगण्याचा मार्ग दाखवला.

त्यांच्या कणखर आधारामुळे मला खंबीर राहण्यासाठी आणि कोणत्याही अडथळ्यावर मात करण्यासाठी मोठ्या प्रमाणात शक्ती मिळाली. अतिशय विपरीत परिस्थितींमध्ये सुद्धा सर्वोत्तम साध्य करता येण्यासाठी त्यांच्या कृपेची मदत मला मिळाली. त्यांच्या प्रेमामुळे माझ्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा विकास झाला. त्यांनी आपल्याला जीवन समग्रतेने जगण्यास शिकवले. त्यांनी जे शिकवले, ते सर्व त्यांनी स्वतःच्या आचरणातून दाखवून दिले. त्यांचा प्रत्येक शब्द आणि हावभाव उदारतेने आणि निःस्वार्थतेने भरलेला होता. ते माझ्या जीवनातील मार्गदर्शक दिवा आहेत आणि निरंतर राहतील. ■

## प्रेमस्वरूप गुरुजी

राखी चोप्रा, अनुवाद : सुनिता देशपांडे

गुरुजींच्या योग्यतेची उंची अतुलनीय आहे. गुरुजी म्हणजे एक खरी प्रेरणा, एक सच्चे मार्गदर्शक, आणि संपूर्ण मानवतेसाठी देवाने धाडलेले एक गुरू होते.

निराश झालेल्या कित्येक लोकांना त्यांनी आशा दिली. त्यांनी आपल्याला संपूर्ण स्वातंत्र्य आणि अमर्याद प्रेम दिले. त्यांनी आपल्याला चुका करून खाली पडण्याचेसुद्धा स्वातंत्र्य दिले. पण आपल्याला परत वर ओढून पुन्हा चालते करण्यासाठी ते सतत आपल्या पाठीशी असत. अवघड मार्गांवर आपण मोठी पावले टाकण्यासाठी त्यांनी आपल्याला प्रचंड शक्ती आणि आत्मविश्वास दिला. आपल्या विद्यार्थ्यांवर त्यांचे इतके प्रेम होते, की मानवी शरीर सोडल्यानंतर अजूनही, आपल्या जीवनात ठेच लागू नये यासाठी ते आपला हात धरून आहेत. त्यांच्या शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी मानवतेसाठी कार्य केले. ते निश्चितच प्रेमाचे सारस्वरूप होते. 'प्रेम अनुभवणे आणि आपल्या आचरणातून प्रकट करणे' हीच या महान गुरुंसाठी खरी श्रद्धांजली होईल. ■


## आमची प्रकाशने


| | |
|---|---|
| Doorways to Light | 200/- |
| New Age Realities | 200/- |
| Higher Communication & Other Realities | 100/- |
| 2012 - End or Beginning | 100/- |
| Preparing for 2012 | 100/- |
| Light Body & Other Realities | 75/- |
| Master-Pupil Talks | 60/- |
| iGuruji Vol 1,3,4 & 7 | each 150/- |
| iGuruji - Vol 2 | 120/- |
| iGuruji - Vol 5 | 100/- |
| iGuruji - Vol 6 | 75/- |
| Living in the Light of My Guru | 220/- |
| How to Meditate | 50/- |
| Dhyana Yoga | 50/- |
| Descent of Soul | 50/- |
| Practising Shambala Principles | 50/- |
| Astral Ventures of A Modern Rishi | 50/- |
| Channelled Knowledge from the Rishis | 250/- |
| Channelled Knowledge from the Rishis - Vol 2 | 150/- |
| Channelled Knowledge from the Rishis - Vol 3 | 200/- |
| Guruji Speaks Part - I & II | each 200/- |
| Guruji Speaks Vol - 3 | 150/- |
| Guruji Speaks Vol 4, 5 & 6 | each 200/- |
| The Book of Reflections - Vol 1 & 2 | each 200/- |
| Meditators on Meditations | 75/- |
| Meditators on Experiences | 75/- |
| Meditational Experiences | 150/- |
| Awareness | 60/- |
| Living in Light | 10/- |
| Light | 10/- |
| Quotes from the Rishis | 100/- |
| Pyramid Revelations | 75/- |
| ऋषींकडून मिळालेले ज्ञान (Marathi) | 200/- |
| प्रकाशवाट (Marathi) | 150/- |
| २०१२ – अंत की आरंभ? (Marathi) | 100/- |
| २०१२ – सालाची तयारी (Marathi) | 100/- |
| आयगुरूजी (Marathi) | 100/- |
| ध्यान कसे करावे (Marathi) | 50/- |
| ध्यानयोग (Marathi) | 50/- |
| आत्म्याचे पृथ्वीवर अवतरण (Marathi) | 50/- |
| शंबला तत्त्वांचा अभ्यास (Marathi) | 50/- |
| एका आधुनिक ऋषीचे सूक्ष्मजगातील पराक्रम (Marathi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Marathi) | 10/- |
| प्रकाश (Marathi) | 10/- |
| उच्चस्तरीय संवाद आणि इतर सत्ये (Marathi) | 100/- |
| गुरु–शिष्य संवाद (Marathi) | 60/- |
| ध्यान कैसे करें (Hindi) | 50/- |
| ध्यान-योग (Hindi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Hindi) | 10/- |
| प्रकाश (Hindi) | 10/- |
| प्रकाश की ओर (Hindi) | 150/- |

### ही पुस्तके खालील ठिकाणी मिळतील:

**मुंबई:** चेतना बुक सेन्टर, फोर्ट (फोन:२२८५१२४३)
मेजस्टिक एजन्सीज, विले पार्ले (पू) (फोन: २६१३२८७९)
गिरि ट्रेडिंग एजन्सी, डोंबिवलि (पू) (फोन: ०२५१–२८६–१८९०/२४४–९५८५)
गिरि ट्रेडिंग एजन्सी, गोरेगाव (प) (फोन: २८७६७२९८)
गिरि ट्रेडिंग एजन्सी, माटुंगा (फोन: २४१२२३१६, २४१४१३४४)
गिरि ट्रेडिंग एजन्सी, नवी मुंबई (फोन:३२५२२४९१)

**पुणे:** संस्कृती प्रकाशन, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४९७३४३)
द इंटरनॅशनल बुक सर्विस, डेक्कन जिमखाना (फोन: २५६७७४०५)
द वर्ड बुक शॉप, कँप (फोन: २६१३३११८, ३०५८००१०/११, ९३७०६७८११३/४)
उज्वल ग्रंथ भंडार, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४५६९०८, ६५२२६१३७)
यशवंत प्रकाशन, सदाशिव पेठ (फोन:२४४७०५३३)

**नागपुर:** दिलीप बुक एजन्सी, मेडिकल चौक (फोन: ६५९५०३२)



**गुरुजी कृष्णानंद (१९३९ – २०१२)**

### मानसा फाउंडेशन (रजि)

प्रकाशाच्या कार्याशी निगडित आहे आणि तपोनगरात आणि बंगलोर शहरात ध्यानवर्ग चालवण्याचे कार्य करते. गुरुजी कृष्णानंदांनी १९८८ मधे ह्या संस्थेची स्थापना केली.

### मानसा

बंगलोर पासून २० कि.मी. अंतरावर आहे. ही ध्यान करणाऱ्यांची एक उमलती जागा आहे. महर्षी अमरांना १९३५ साली इथे ऋषींच्या कार्यासंबंधी आणि प्रकाशाच्या एका आगामी शहराबद्दल साक्षात्कार झाला होता.

इथे कॉस्मिक टॉवर, कुंडलिनी मंदिर आणि तपोवन या ध्यान करण्यासाठी विशिष्ट जागा आहेत.

इथे ''मानसी'' नावाचे एक विशेष शक्तीक्षेत्र तपोनगराच्या सभोवताली ऋषींनी प्रस्थापित केले आहे आणि विशेष शक्ती इथे गोळा करून ठेवल्या आहेत.

### अंतरमानसा

मानसाचे जन्मस्थान, तपोनगरच्या १ कि.मी. पलीकडे, नाडगौडा गोलाहल्ली नावाच्या गावात आहे. इथे एक झोपडी आणि इतर अशा जागा आहेत ज्यांच्यात गुरुजी १९८७ ते १९९२ पर्यंत राहिले होते.

### स्टडी सेंटर

हे अंतरमानसा येथे, ऋषींच्या मार्गदर्शनाखाली आध्यात्मिक सत्यांच्या अभ्यासासाठी असलेले, एक विशेष केंद्र आहे.

### ज्योती प्रॉजेक्ट

मुख्यत्वेकरून गावातल्या मुलांसाठी आहे. मुलांना शाळेतल्या त्यांच्या अभ्यासात मदत केली जाते आणि त्यांना श्लोक, भजन, स्वच्छता, सामान्य ज्ञान आणि कंप्यूटरचे प्रशिक्षण दिले जाते. ड्राइंग, पेंटिंग आणि गोष्टी सांगण्याच्या कलेतून व्यक्त करण्यासाठी, त्यांना प्रोत्साहित केले जाते.

### भेट देणाऱ्यांसाठी

दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सर्वांना ध्यानासाठी परवानगी आहे

### अपील

कृपया आमच्या सेवेस मदत करावी. चेक/ड्राफ्ट मानसा फाउंडेशनच्या नावाने काढावा. ८०–जी अंतर्गत आयकरात सूट मिळेल.

RNI. No. KARMAR/2008/27314 Registered Postal Regn. No. L/CNA/68/2012-14
Date of posting Newsletter-25th of Every Month. Posted at Bangalore GPO No. of Pages-8

# गुरुजींना अभिवादन

(फेसबुक व ई–मेल व्दारा प्राप्त झालेले संदेश)
(संकलन: शोभा राव, अनुवाद: गुरुराज कानडे)

आयुष्यात आजतागायत मला भेटलेल्या सर्व व्यक्तींमध्ये गुरुजी हे सर्वोत्तम व्यक्ती होते. गेल्या महिन्यातच त्यांचे दर्शन मला लाभल्याने मला विशेष कृपा प्राप्त झाल्यासारखे वाटते. स्वत:चे आयुष्य वेचून, जे सर्वकाही आम्हाला तुम्ही दिले त्याबद्दल, धन्यवाद गुरुजी! मला खात्री आहे की आपण जेथे कुठे असाल तेथून आम्हाला मार्गदर्शन कराल. माझ्या उर्वरित आयुष्यात आपल्या अपेक्षेच्या कसोटीला उतरू शकेन अशी आशा करते.

– पूर्णिमा हेवन

त्यांच्या आत्म्यास शांती लाभो! गुरुजी अतिशय प्रेमळ आत्मा होते. जेव्हाही मला प्रश्न पडले, त्याची उत्तरे त्यांनी मला दिली. मला कृपाप्राप्त झाल्यासारखे वाटते. मी अशा महान व थोर आत्म्या करिता प्रार्थना करते.

– उषा नायर

विशेषत: २१ डिसेंबर इतक्या जवळ असताना, गुरुजींच्या निधनाने मी दु:खी व स्तंभित झालो आहे. मी त्यांना त्यांच्या आश्रमात २००९ साली भेटलो होतो. त्यांचा संदेश व प्रकाश यामुळे मी त्यांच्याकडे आकर्षित झालो.

– स्टीफन केन्नी

गुरुजी, माझ्या जीवनात मार्गदर्शक प्रकाश झाल्याबद्दल, मी मनापासून कृतज्ञ आहे. आपण सांगितल्याप्रमाणे आपण पुन्हा पुढील कालचक्रात भेटणार आहात. तोपर्यंत मी स्वत: प्रकाश धारण करीन व तो सर्वांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करीन.

– किरण सिंग

दि. २३ नोव्हेंबर २०१२ रोजी सकाळी ध्यानामध्ये मी गुरुजींना व सप्तर्षींना ''कृष्णा'' चा जप करताना पाहिले. मला याचे आश्चर्य वाटले. मी गुरुजींना याबद्दल लिहिणार होते, पण तितक्यात मला ही बातमी मिळाली. गुरुजी, माझ्या आंतरिक प्रवासाचे मार्गदर्शक प्रकाश झाल्याबद्दल, मी आपली आभारी आहे.

– नीता शर्मा

गुरुजी कृष्णानंद खरोखरच प्रकाश देणाऱ्या शांत ज्योतीसम होते. ते असेच चमकत राहावेत व यापुढे त्यांनी सर्वांना असेच मार्गदर्शन करावे. त्यांची पुस्तके सोपी व त्यांचे संदेश प्रेमाने भरलेले आहेत.

– डॉ. तृप्ती जयिन

मला माहीत आहे की ते आपल्या सर्वांना नेहमीच मार्गदर्शन करतील पण अजूनही हे सत्य स्वीकारणे मला कठीण जात आहे. आपल्याला माहीत आहे की ते आता आत्म्याच्या रूपात आहेत पण तरी देखील दु:ख होते.

– चैतन्य सर्गो

ते मृत्युच्या पलीकडे आहेत, अमर आहेत. मी त्यांच्यावर सदैव प्रेम करीन !

– राधा कीर्तने

मी भाग्यवान आहे कारण मला आपल्यासारखा गुरु लाभला. कोटी कोटी प्रणाम. आपण आमच्या आध्यात्मिक प्रगती करिता आशीर्वाद द्या, जेणेकरून आपण जसा महर्षी अमरांशी संपर्क करू शकत होता, तसाच संपर्क आम्ही देखील आपल्याशी करू शकू.

– धरा भत्रवल

आपल्या प्रत्यक्ष सहवासाची उणीव जाणवेल पण तरी देखील आपल्याप्रती आमचे प्रेम व आदर आणखी वाढले आहेत. आणि ते वाढतच राहील. आपल्या आल्हाददायक आशीर्वादांचा वर्षाव अखंडपणे आमच्यावर होत राहावा.

– चंद्रमौळी भट

या जगाला दु:खापासून वाचविण्याकरिता कदाचित सप्तर्षींना आपली गरज असावी. पण आमच्या प्रार्थनांमध्ये आपण नेहमी आमच्या बरोबर असाल.

– जॉली भट

ते अजूनही आपल्यातच आहेत. त्यांना गुडबाय म्हणण्याची गरज नाही.

– तकहिरो जेम्स नल फ्रेन्ड

आपल्या सहवासाची रिक्तता फक्त ऋषींचे अनुसरण करूनच भरून काढणे शक्य आहे.

– संदीप बॅनर्जी

ही दु:खद बातमी ऐकून मी फार व्यथित झाले आहे. जरी मी खूप दूरवर राहत असले तरीही गुरुजी मला फार प्रिय आहेत व माझ्यासाठी ते खूप विशेष व्यक्ती आहेत. मी सूक्ष्म देहाने त्यांच्या अंत्यसंस्कारांना हजर राहीन. एक विलक्षण गोष्ट म्हणजे त्या दिवशी सकाळी उठल्यानंतर ही बातमी वाचण्यापूर्वी सर्वप्रथम मी गुरुजींना पाहिले. त्यांची जुनी व्याख्याने पाहण्याची मला एकाएकी गरज वाटली. बऱ्याच जणांना त्यांची उणीव भासेल पण अजूनही ते आपल्या सोबत आहेत. ह्या घटनेमुळे माझा प्रकाशाची निवड करण्याचा व प्रेम आणि प्रकाश पसरविण्याचा निर्धार आणखी पक्का झाला आहे.

– लिंडा सॉयर

PRAKASHMARG A Marathi Monthly Newspaper, Annual Subscription: Rs. 300/-
Printed, Published and Edited by Jayant Deshpande on behalf of Manasa Foundation (R).
Published from Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, (off Hennur-Bagalur Road), Bangalore Urban - 560 077 and
Printed at M/s. ART PRINT, Dr. Modi Hospital Main, WOC Road, Bangalore - 86. Phone : 2335 9992
Owner: Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, (off Hennur-Bagalur Road), Bangalore Urban - 560 077.
Editor : Jayant Deshpande